**ठळक बातम्या**

- राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ३ टक्क्यांनी वाढून ५३ टक्के, जुलैपासून थकबाकी या महिन्याच्या वेतनात मिळणार
- १९७६ पूर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पांमुळे पुनर्वसन झालेल्या ३३२ गावठाणांमधल्या अपूर्ण नागरी सुविधा पूर्ण करण्याचा राज्य मंत्रीमंडळाचा निर्णय
- राज्य सरकारचा पहिला छत्रपती संभाजी महाराज महाराष्ट्र प्रेरणा गीत पुरस्कार स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या अनादी मी, अनंत मी या गीताला जाहीर
- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना उद्या विदर्भ आणि केरळ यांच्यात होणार

**आणि**

- मुंबईसह कोकणात येत्या २-३ दिवसात उष्णतेची लाट येण्याचा हवामान विभागाचा इशारा

**<><><><><>**

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ३ टक्के वाढ झाली. आता राज्य सरकारी सेवेतल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ५३ टक्के महागाई भत्ता मिळेल. १ जुलैपासून ही दरवाढ लागू होणार आहे आणि जुलै ते जानेवारी दरम्यानची थकबाकी या महिन्यातल्या वेतनासह दिली जाणार आहे.

**<><><><><>**

राज्यात १९७६ पूर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पांमुळे पुनर्वसन झालेल्या ३३२ गावठाणांमध्ये अपूर्ण राहिलेल्या नागरी सुविधा पुरवण्यासाठी कृती कार्यक्रम राबवायचा निर्णय राज्य मंत्रिमंडळानं घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय झाला. या कामांसाठी ५९९ कोटी ७५ लाख रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करायलाही यावेळी मंजुरी देण्यात आली.

महाराष्ट्र राज्य आधारसामग्री, अर्थात डेटा धोरण आणि या धोरणाच्या मसुद्यालाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली. शासनाच्या विविध विभागांकडे एकत्र होणाऱ्या माहितीचा गतीमान कामकाजासाठी, तसंच योजना, प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वापर करून घेण्याच्या दृष्टीनं हे धोरण तयार केलं आहे. त्यासाठी मित्रा संस्थेतंर्गत राज्य विदा प्राधिकरण स्थापन करायलाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली.

बीड जिल्ह्यात परळी, आणि पुणे जिल्ह्यात बारामती इथं पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालयांना आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजूरी देण्यात आली. पुणे जिल्ह्यात पौड इथं कनिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय, आणि प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाची स्थापना करायला, त्यासाठी आवश्यक पदांना, तसंच त्यासाठीच्या आर्थिक तरतुदीला आजच्या झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. शासकीय कर्मचाऱ्यांचं वेतन आणि भत्ते प्रदान करण्यासाठी तसंच महामंडळ, सार्वजनिक उपक्रम यांच्याकडच्या अतिरिक्त निधी गुंतवणूकीसाठी ठाणे जनता सहकारी बँकेत खातं उघडायलाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली.

**<><><><><>**

प्रेरणादायी गीताला राज्यशासनातर्फे या वर्षीपासून छत्रपती संभाजी महाराज महाराष्ट्र प्रेरणा गीत पुरस्कार दिला जाईल, अशी घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांनी आज केली. पहिला प्रेरणा गीताचा पुरस्कार स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या अनादी मी, अनंत मी या गीताला देत असल्याचंही शेलार यांनी जाहीर केलं. फ्रान्सच्या दौऱ्यावर असलेल्या शेलार यांनी आज मार्सेलिस बंदर इथे झालेल्या बैठकीत ही घोषणा केली. २ लाख रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजने अंतर्गत राज्यात २२ हजार १० प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. याअंतर्गत २० हजार प्रकल्पांचा टप्पा ओलांडणारं महाराष्ट्र देशातलं पहिलं राज्य ठरलं आहे. यात सर्वाधिक १ हजार ८९५ प्रकल्प छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आहेत. त्यानंतर अहिल्यानगर, सांगली या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. कृषी आयुक्तालयाच्या राज्य नोडल अधिकारी यांच्या कार्यालयानं ही माहिती दिली आहे. यामुळे राज्यात २ हजार २६३ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून ३८९ कोटी रुपयांचं अनुदान लाभार्थ्यांना दिलं गेलं आहे. मंजूर झालेल्या प्रकल्पांमधे तृणधान्य उत्पादन, मसाले उत्पादन, फळ उत्पादन, दुग्ध उत्पादन, तेलबिया उत्पादन, पशुखाद्य उत्पादन, ऊस उत्पादन, मांस उत्पादन, सागरी उत्पादन आदी प्रकल्पांचा समावेश आहे.

**<><><><><>**

नवी मुंबई महानगरपालिकेचा २०२५-२६ चा अर्थसंकल्प आयुक्त तथा प्रशासक डॉक्टर कैलास शिंदे यांनी आज जाहीर केला. तेराशे एक कोटी आरंभीच्या शिलकेसह ५ हजार ७०९ कोटी जमा, ५ हजार ६८४ कोटी खर्च आणि २५ कोटी शिलकेचा हा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पात आरोग्य व्यवस्थेचं बळकटीकरण, जल व्यवस्थापन, पर्यावरण, वित्तीय सुधारणा, सौर ऊर्जा यंत्रणा, शिक्षण, स्वच्छता यावर भर देण्यात आला आहे.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना, उद्या विदर्भ आणि केरळ यांच्यात होणार आहे. नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडिममधे उद्या सकाळी साडेनऊ वाजता हा सामना सुरु होईल.
या स्पर्धेत विदर्भानं सातपैकी ६ सामने जिंकून ४० गुणांची कमाई केली. तर केरळनं सातपैकी ३ सामने जिंकून २८ गुण कमावले आहेत.

**<><><><><>**

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती देण्याबाबतचा अंतिम निकाल नाशिक जिल्हा न्यायालयानं शनिवारपर्यंत राखून ठेवला आहे. याप्रकरणी आज सुनावणी झाली. मुख्यमंत्री स्वेच्छाधिकार कोट्यातली सदनिका मिळवण्यासाठी माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू विजय कोकाटे यांनी खोटं प्रतिज्ञापत्र दिलं होतं, त्यामुळे न्यायालयानं दोघांनाही दोन वर्षांची शिक्षा ठोठावली आहे.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी उज्ज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती करावी आणि फरार कृष्णा आंधळेला तत्काळ अटक करावी या मागणीसाठी ग्रामस्थांनी आजपासून दोन दिवसांच्या अन्नत्याग आंदोलनाला सुरूवात केली आहे. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

<><><><><>

बिटकॉईन क्रिप्टोकरन्सी घोटाळ्याप्रकरणी सीबीआय देशभरातल्या ६०हून अधिक ठिकाणी व्यापक छापे टाकले आहेत. पुणे, कोल्हापूर, नांदेड, दिल्ली, चंदिगड, बेंगळुरू अशा शहरांमध्ये हे छापे टाकले गेले आहेत. गेन बिटकॉईन नावाने ही कंपनी २०१५ मध्ये सुरू झाली होती. या कंपनीने १८ महिन्यांसाठी दरमहा १० टक्के दराने फायदेशीर परतावा देण्याचं आश्वासन दिलं होतं. २०१७मध्ये या कंपनीचा घोटाळा उघड झाला होता. त्यानंतर या कंपनीविरोधात देशभरात तक्रारी दाखल झाल्या होत्या.

<><><><><>

पुणे सीमाशुल्क विभागाच्या हवाई गुप्तचर शाखेनं अमेरिकन चलनाचा समावेश असलेल्या हवाला रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. या रकमेचं मूल्य जवळपास साडेतीन कोटी रुपये असून या कारवाईत दोघांना अटक केल्याची माहिती एका उच्च पदस्थ अधिकाऱ्यानं दिली आहे. १७ फेब्रुवारी रोजी दुबईहून पुण्याला आलेल्या एका व्यक्तीने आणि तीन प्रवाशांच्या मदतीने परकीय चलन लपवून आणल्याची माहिती सीमाशुल्क विभागाला मिळाली होती. त्यानंतर पुण्यातल्या दहा ठिकाणी छापा टाकून ही कारवाई करण्यात आली.

<><><><><>

ठाणे महापालिकेनं ८१ अनधिकृत शाळांपैकी ६८ शाळांविरोधात पोलीस तक्रार केली आहे. या शाळा निवासी संकुल अथवा भाड्याच्या जागेतून बेकायदेशीरपणे चालवल्या जात असून या शाळांमध्ये १९ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे. पालिकेनं शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत या शाळांना ५२ कोटी रूपयांचा दंडही ठोठावला आहे. दिवा प्रभाग समिती परिसरात सर्वाधिक ६५ अनधिकृत शाळा असून ३२ शाळांचे पाणी कनेक्शन तोडण्यात आलं आहे. अनधिकृत शाळांमधल्या विद्यार्थ्यांना अधिकृत शाळांमध्ये स्थलांतरित करण्याचं पालिकेनं कळवलं आहे.

<><><><><>

काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष विजय अंभोरे यांनी पदांचा राजीनामा दिला आहे. याबाबतची घोषणा त्यांनी पत्रकार परिषद घेऊन केली.

<><><><><>

मुंबईसह कोकणात सर्व जिल्ह्यांमधे पुढचे दोन-तीन दिवस उष्णतेची लाट येण्याचा इशारा भारतीय हवामान विभागानं दिला आहे. या परिसरात तापमान ३७ ते ३८ अंश सेल्सिअस पर्यंत वाढेल, असा अंदाज आहे. त्यामुळे हवामान विभागानं यलो अलर्ट जारी केला आहे. याविषयी भारतीय हवामान विभागाच्या वैज्ञानिक सुषमा नायर यांनी सांगितलं…

आज मुंबईत सांताक्रुझ इथं सर्वाधिक ३८ पूर्णांक ७ अंश सेल्सियस तापमानची नोंद झाली.

//<><><><><>//